# ॐ नमोजी आद्या

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ॥
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥1॥

देवा तूंचि गणेशु । सकळमति प्रकाशु ॥
म्हणे निवृत्ति दासु । अवधारिजो जी ॥2॥

अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ॥
मकार महामंडल । मस्तकाकारें॥3॥

हे तिन्ही एकवटले । तेथें शब्दब्रह्म कवललें॥
ते मियां श्रीगुरुकृपें नमिलें । आदिबीज ॥4॥

आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कलाकामिनी॥
ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मीयां॥5॥

https://alltvads.com/bhajan/lyrics/id/25309/title/om-namoji-aadya

अपने Android मोबाइल पर BhajanGanga App डाउनलोड करें और भजनों का आनंद ले |